**// प्रेस नोट //**

**दिनांक 29/08/2018.**

**लोकसेवक राजेंद्र श्रीरंग ओव्हाळ, वय-42 वर्षे, वरिष्ठ सहायक, शिक्षण विभाग, प्राथमीक, जिल्हा परिषद, बीड वर्ग-3 यांना 5,000/- रुपये लाच स्विकारताना रंगेहात पकडले.**

---

दि.28/08/2018 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, बीड या कार्यालयात तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार हे सेवानिवृत्त असुन त्यांचे सेवापटात पुर्ण नोंदी घेऊन सेवापट जिल्हा परिषद, परभणी येथे पाठविण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमीक शिक्षण विभागातील वरिष्ठ सहायक ओव्हाळ हे 5,000/-रु.लाचेची मागणी करत आहेत,वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.

त्यावरुन तक्रारदार यांचे तक्रारीची खात्री केली असता लोकसेवक ओव्हाळ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी 5,000/-रु.लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले.

त्यानुसार आज दि.29/08/2018 रोजी लोकसेवक ओव्हाळ यांचेविरुध्द शिवाजी चौक, बीड समोरील नगर रोडवरील हॉटेल मेघराजचे आजुबाजूस लाचेचा सापळा आयोजीत केला असता लोकसेवक ओव्हाळ यांना तक्रारदार यांचेकडुन 5,000/-रु.लाच रक्कम स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आलेले आहे. लोकसेवक राजेंद्र श्रीरंग ओव्हाळ, वय-42 वर्षे, वरिष्ठ सहायक, शिक्षण विभाग, प्राथमीक, जिल्हा परिषद, बीड वर्ग-3 यांचेविरुध्द पोलीस ठाणे शिवाजीनगर,बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक डॉ.श्री.श्रीकांत परोपकारी साहेब, मा.श्री. जिरगे, अप्पर पोलीस अधीक्षक सो,असेीबी औरंगाबाद, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपअधी.श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील असेीबी, बीड, पोलीस निरीक्षक श्री.गजानन वाघ असेीबी, बीड व कर्मचारी दादासाहेब केदार, अशोक ठोकळ, बापुराव बनसोडे, विकास मुंडे, अमोल बागलाने, राकेश ठाकुर, मनोज गदळे, सखाराम घोलप, भरत गारदे व चालक सय्यद नदीम व मेहेत्रे यांनी केली आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक/ लोकप्रतिनिधी लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | **:- 1064** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **:- 02442/222649** |
| **मेल आयडी** | **:- dyspacbbeed@gmail.com** |
| **वेबसाईट** | **:- www.acbmaharashtra.gov.in** |
| **मोबाईल ॲप** | **:- www.acbmaharashtra.net** |
| **फेसबुक पेज** | **:- www.facebook.com/MaharashtraACB** |

29/8.

**( बाळकृष्ण हनपुडे पाटील )**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड.**

उप-अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बीड महाराष्ट्र